**प्रेसनोट दिनांक - १८/०५/२०१९**

**डेक्कन पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**हरवलेली पर्स त्यामधील कागदपत्रे व रोख रक्कम पोलीसांचेमुळे परत मिळाली.**

---

दिनांक १५/०५/२०१९ रोजी पोलीस शिपाई ७४४० मलगुंडे व पोलीस शिपाई ११६९ चव्हाण यांना प्रभात बीट मार्शल ड्यटी असताना शालन विठ्ठल ओव्हाळे पौड रोड हनुमान नगर पुणे या महिलेने गल्ली नंबर १४ मध्ये सापडलेली पर्स दिली. बीट मार्शल कर्मचारी यांनी सदरची पर्स उघडुन त्यामधील नाव पत्ता यावरुन एक महिला,वय-२५ वर्षे,रा.कोथरुड डेपो जवळ एकलव्य कॉलनी,जिजाऊनगर कोथरुड,पुणे यांचेशी संपर्क करुन,त्यांना प्रभात पोलीस चौकीस बोलावुन घेऊन त्यांची हरवलेली पर्स त्यामध्ये ॲक्सिस व स्टेट बँकेचे एटीएम कार्ड, दुचाकी वाहन चालवण्याचा परवाना व इतर महत्त्वाची कागदपत्रे तसेच रोख ५०० रुपये ताब्यात दिले. सदर महिला व तीचे आईने पोलीसांच्या मुळे आमची महत्त्वाची कागदपत्रे वेळेत परत मिळाली असे म्हणुन पोलीसांचे आभार मानले.